**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या खासगी शाळा आणि शिकवणी वर्गांच्या शुल्कावर मर्यादा आणण्यासाठी सरकार लवकरच धोरण जाहीर करणार

- चौथं विश्व मराठी साहित्य संमेलन नाशिकमधे सुरु /कृत्रिम बुध्दीमतेसह अनेक प्रकारची आव्हानं असूनही अभिजात मराठी टिकूनच राहील, असा मुख्यमंत्र्यांचा उद्घाटनपर भाषणात विश्वास

- कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्ने चार दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी मुंबईत दाखल

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ९६१ अंकांची घसरण

**<><><><><>**

राज्यातल्या खासगी शाळा आणि शिकवणी वर्गातल्या शुल्कावर मर्यादा आणण्यासाठी सरकार लवकरच धोरण जाहीर करणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत केली. राज्यातल्या शाळांची परिस्थिती, शिक्षणाचा अधिकार आणि संबंधित विषयावर सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर ते उत्तर देत होते. येत्या शैक्षणिक वर्षात मराठी शाळांमधली पटसंख्या किमान २५ टक्के वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्य शासन मराठी माध्यमाच्या शाळांकडे विशेष लक्ष देऊन सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देत आहे, याखेरीज इतर अनेक उपक्रमही राबवले जात आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

शिक्षणाच्या अधिकाराअंतर्गत प्रवेशासाठीची १ किलोमीटरची मर्यादा, शाळा नसतील तिथं शिथिल करण्याचा विचार करू असं आश्वासन भुसे यांनी दिलं. राज्यातल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुविधा वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं आश्वासन त्यांनी दिलं. राज्यातल्या सर्व माध्यमाच्या आणि व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी शिकवणं बंधनकारक असून एखाद्या शाळेत याची अंमलबजावणी होत नसली तर सरकार त्यावर कारवाई करेल असं आश्वासन त्यांनी दिलं.

राज्यात कोणत्याही मराठी माध्यमाच्या शाळा बंद केल्या जाणार नाहीत अशी ग्वाही शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आपल्या विभागातील पुरवणी मागण्यांवरच्या चर्चेला उत्तर देताना दिली. आर टी इ अंतर्गत प्रवेश प्रक्रिया पार पाडण्यासाठी १ लाख १२ हजार ७७७ शाळा उपलब्ध असून त्यात आलेल्या अर्जांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाईल असं ते म्हणाले.

यानंतर दोन्ही विभागाच्या पुरवणी मागण्यांसह इतर विभागाच्याही मागण्या सभागृहात मंजूर करण्यात आल्या, त्यानंतर विनियोजन विधेयक ही मंजूर करण्यात आलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधान परिषदेत सादर केलं. नव्या सुधारणांनुसार, कोणत्याही सदस्याला अध्यक्ष तसंच परिषद सदस्य म्हणून निवडून आल्यास, एकाच वेळी दोन्ही पदं धारण करता येतील, मात्र केवळ एकच मत देता येईल. तथापि समसमान मते पडल्यास अध्यक्ष म्हणून निर्णायक मत देता येईल. नगरपंचायतीलाही हाच नियम लागू होईल.

**<><><><><>**

नाशिकच्या कुसुमाग्रज नगरीत आयोजित चौथ्या विश्व मराठी संमेलनाचं उदघाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते झालं. राज्य शासनाच्या पुरस्कारांचं वितरण मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी झालं.

सध्या भाषांसमोर अनेक प्रकारची आव्हानं उभी आहेत. कृत्रिम बुध्दीमता हे देखील आव्हान आहे. मात्र, मराठी भाषा, मराठी सारस्वतांचे नवे विचार कृत्रीम बुध्दीमता हिरावून घेऊ शकणार नाही. या काळात देखील अभिजात मराठी टिकूनच राहील, असा विश्वास फडनवीस यांनी यावेळी व्यक्त केला. कृत्रीम बुध्दीमतेचा मराठी भाषेसाठी अनुकूल वापर झाला पाहिजे. जे ग्रामीण साहित्य अनुवादित करण्यासाठी साहित्यिकांकडे पुरेसं बळ नाही त्यांना हे उपयुक्त ठरू शकेल. असं ते म्हणाले. मराठी ही संवादाची, ज्ञानाची, संशोधनाची आणि चरीतार्थाची भाषा झाली पाहिजे, त्यासाठी शासनाचा मराठी भाषा विभाग प्रयत्न करत आहे. आता पाचवं मराठी साहित्य संमेलन विदर्भात, तर त्यानंतरच्या वर्षी परदेशात भरवावं, अशी सूचनाही त्यांनी केली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मराठी भाषेला मोठी परंपरा असल्याने ती टिकून राहील असा विश्वास व्यक्त केला. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी लंडनमध्ये मराठीचं वैश्विक केंद्र उभं राहत असल्याचं सांगितलं. यशवंतराव चव्हाण यांच्या नावानं साहित्याची अनुवाद समिती स्थापन करणार असल्याची घोषणा त्यांनी प्रास्ताविकात केली.

यावेळी डॉ. भालचंद्र नेमाडे यांना साहित्य भूषण, श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना विंदा करंदीकर जीवनगौरव, तर शांतिब्रह्म, गुरूवर्य मारुतीबाबा कुरेकर यांना विश्व मराठी संमलेनाच्या विशेष पुरस्कारानं गौरविण्यात आले. संत निवृत्तीनाथ महाराजांचे साहित्यासाठी नाशिकच्या संत निवृत्तीनाथ महाराज संजीवन समाधी ट्रस्टला ५० लाख रूपयांच्या मदतीचा धनादेश यावेळी देण्यात आला.

मंत्री गिरीश महाजन आणि छगन भुजबळ, तसंच संमेलनाचे स्वागताध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे यांच्यासह अन्य आमदार आणि ज्येष्ठ साहित्यिक उपस्थित होते.

<><><><><>

कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्ने आजपासून चार दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी मुंबईत पोचले. विमानतळावर राज्य सरकारचे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी कार्ने यांचं स्वागत केलं. आजपासून दोन दिवस ते विविध कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी, उद्योजक, अर्थतज्ज्ञ, नवोन्मेषकर्मी, तसंच शिक्षणतज्ज्ञ यांच्या भेटी घेणार आहेत. 1 मार्चला ते नवी दिल्लीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदींची भेट घेतील. उभय नेते भारत आणि कॅनडादरम्यानच्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेतील तसंच, व्यापार आणि गुंतवणूक, ऊर्जा, मौल्यवान खनिजं, कृषि, शिक्षण, आणि संशोधन क्षेत्रात परस्पर सहकार्याच्या संधीबाबत चर्चा करतील. मार्क कार्ने यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे.

<><><><><>

अमेरिका आणि इराणमधल्या वाढत्या तणावामुळे आणि विविध क्षेत्रांमध्ये समभागांची विक्री वाढल्यामुळे आज देशातल्या शेअर बाजारांमध्ये मोठी घसरण झाली. भूराजकीय अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर गुंतवणुकदारांनी जोखीम टाळण्याचा मार्ग स्वीकारल्यामुळे सकाळी व्यवहार सुरू झाल्यापासूनच घसरणीचं चिन्हं दिसत होतं. दिवसअखेरच्या शेवटच्या अर्ध्या तासात या घसरणीत वाढ झाली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ९६१

अंकांची घसरण झाली आणि तो ८१ हजार २८७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३१८ अंकांची घसरण नोंदवत २५ हजार १७९ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

मराठी भाषा गौरव दिन आज साजरा होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. मराठी भाषा गौरव दिवसाच्या निमित्तानं विधान भवनातल्या मध्यवर्ती सभागृहात ‘जावे विनोदाच्या गावा’ या विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. भाषणांमधल्या वक्तव्यांचा चुकीचा अर्थ लावला जाऊ नये यासाठी खबरदारी बाळगली जात असल्यानं आता भाषणांमधला विनोदाचा भाग कमी होत चालल्याची खंत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या वेळी व्यक्त केली. **मात्र** जेव्हा एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वावरून संदर्भहीन विनोद केला जातो, तेव्हा त्या विनोदाचा दर्जा घसरतो, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे संपादित ‘लोकसेवेचा लोकजागर’ या ग्रंथाचं प्रकाशनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनीही या दिनानिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. मराठी भाषा ही धर्म, संप्रदाय आणि जातीच्या पलीकडे जाऊन लोकांना जोडणारी भाषा आहे, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

मराठी भाषा भवन आणि मराठी रंगभूमीचं दालन यांच्या कामाला मागच्या सरकारनं स्थगिती दिली होती, ते पुन्हा एकदा सुरू व्हावं अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी विधान भवन परिसरात बातमीदारांशी बोलताना केली…..

**- - होल्ड- बाईट - आदित्य ठाकरे - -**

**- <><><><><>**

टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या **'सुपर एट'** फेरीत, आज कोलंबोत, इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात लढत होत आहे. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

गेल्या २४ तासात कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली.

येत्या दोन दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//